निर्भीड, परखड, वास्तववादी व परिवर्तनशील विचारसरणीचे....

दैनिक निशस्त्र योध्दा

निशस्त्र योध्दा मराठी — आवाज तुमचा, लढा आमचा !

मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com

मेहकर | बुधवार । ०९ सप्टेंबर २०२६ । वर्ष-पहिले । अंक क्र. १७३ । पृष्ठे-४ । किंमत-४ रू. बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ. संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द

## आश्रमशाळा कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक - मंत्री डॉ. अशोक वुईके

**मुंबई :** शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून, कोणत्याही कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. रास्त मागण्यांचा नियमानुसार विचार करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी सांगितले. आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांच्या अध्यक्षतेखाली आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत बैठक झाली. बैठकीस माजी आमदार सुधाकर आडबाले, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यासाठी 'इको-फ्रेंडली गणेश मूर्ती रंगरंगोटी महोत्सवा'तून पर्यावरण संवर्धनाचा जागर

- सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन
- मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री नितेश राणे यांच्यासह मान्यवरांचा सहभाग







निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि उद्योग विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'निसर्गमित्र गणेशोत्सव व हातकागद कला संवर्धन' उपक्रमांतर्गत 'इको-फ्रेंडली गणेश मूर्ती रंगरंगोटी महोत्सव-२०२६' चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विविध मान्यवरांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती रंगरंगोटी करून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश दिला.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित या उपक्रमाचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले. मंत्री शेलार यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींवर रंगकाम करून उपक्रमात सहभाग घेतला. यावेळी खादी वस्त्रांचे तसेच 'मधुबन' मध विक्री प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले.



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनीही उपक्रमाला भेट देत पर्यावरणपूरक गणेशमूर्तींवर रंगकाम केले आणि उपक्रमाची पाहणी केली.

या उपक्रमात मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सचिव दत्तात्रय नवले, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे, मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत, सह मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, अर्थसल्लागार व मुख्य लेखाधिकारी सुनील मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार डांगर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील, मुख्यमंत्री कार्यालयाच्या सहसचिव विद्युत वरखेडकर, अवर सचिव मनीष मिलके, सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव जयंत उमराणीकर, गृह विभागाचे उपसचिव संजय डगले, उद्योग विभागाचे उपसचिव अजित सासुलकर तसेच नियोजन विभागाच्या सहसचिव गीतांजली बाविस्कर यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी सहभागी होवून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींवर रंगकाम केले.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या नियंत्रणाखाली पुणे येथे हातकागद संस्था कार्यरत आहे. या संस्थेत विविध प्रकारच्या पर्यावरणपूरक हातकागदाची निर्मिती केली जाते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या चिंध्यांपासून तयार केलेल्या हातकागदाच्या लगद्याचा वापर करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तसेच आकाशकंदील तयार करण्यात येतात.

पर्यावरणपूरक उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, पर्यावरण संरक्षणाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे आणि हातकागद कलेचे संवर्धन करणे, या उद्देशाने मंडळामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पर्यावरणपूरक गणेशमूर्तींच्या वापराला प्रोत्साहन देऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यासाठी नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन मंडळाचे सभापती रवींद्र साठे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत यांनी केले.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांचे आवाहन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि हातकागद संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात 'Paint Your Own Paper Mache Bappa' या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती रंग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी या कार्यशाळेला भेट देऊन हातकागदापासून तयार केलेल्या गणेशमूर्तीला नैसर्गिक रंगांनी रंगवित पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश दिला.

या कार्यशाळेत हातकागदाच्या लगद्यापासून तयार केलेल्या गणेशमूर्तींना नागरिक आणि विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंगांच्या माध्यमातून आकर्षक रूप दिले. पर्यावरण संवर्धनासोबतच पारंपरिक हातकागद कलेचे जतन, स्थानिक कलांना प्रोत्साहन आणि ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, शाश्वत व पर्यावरणपूरक पर्याय म्हणून महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने हातकागदाच्या लगद्यापासून गणेशमूर्ती तयार केल्या आहेत. या मूर्तींचे विसर्जन तुलनेने जलद होते आणि नैसर्गिक रंगांचा वापर करून त्यांना आकर्षक स्वरूप देता येते. चालना मिळण्यासोबतच नैसर्गिक रंगांचा वापर, पारंपरिक हातकागद कलेचे संवर्धन आणि स्थानिक कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळकटी मिळू शकते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि आनंदाचा उत्सव आहे. हा उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. गणेशमूर्तींसाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करण्यासोबतच स्थानिक कलाकार, कारागीर आणि पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. हातकागदापासून तयार केलेल्या गणेशमूर्तींचा वापर करून पर्यावरणाचे रक्षण करण्याबरोबरच स्थानिक कला आणि कारागिरांच्या कौशल्याला बाजारपेठ मिळवून देता येईल. 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा आणि हातकागदासह स्थानिक कलांना प्रोत्साहन द्या, हा संदेश प्रत्येक नागरिकाने स्वीकारावा, असे आवाहनही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

## गणेशभक्तांसाठी मोठी गुड न्यूज! अटल सेतूसह मुंबई-गोवा, मुंबई-बंगळुरु महामार्गावर १७ दिवस टोलमाफी

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी राज्य सरकारने मोठी घोषणा केली आहे. गणेशभक्तांच्या वाहनांना ११ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत टोलमाफी देण्यात आली आहे. यंदाच्या निर्णयाचे विशेष आकर्षण म्हणजे मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूचाही टोलमाफीच्या योजनेत समावेश करण्यात आला आहे. गणेशोत्सवासाठी मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे तसेच राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने नागरिक कोकणाकडे रवाना होतात. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने प्रमुख मार्गांवरील टोलमाफीचा निर्णय घेतला आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ आणि मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील संबंधित मार्गांवर ही सवलत लागू राहणार आहे.

टोलमाफीचा लाभ घेण्यासाठी वाहनांवर 'गणेशोत्सव २०२६ कोकण दर्शन' असा विशेष पास किंवा स्टिकर लावणे आवश्यक आहे. या पासवर वाहन क्रमांक आणि चालकाचे नाव नमूद केले जाणार आहे. संबंधित पास पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे कोकणात जाताना घेतलेला हा पास केवळ जाण्यासाठीच नाही, तर परतीच्या प्रवासासाठीही वैध राहणार आहे. त्यामुळे गणेशोत्सवानंतर मुंबईकडे परतताना पुन्हा स्वतंत्र पास घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

खासगी वाहनांबरोबरच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसनाही या कालावधीत टोलमाफीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे खासगी वाहनाने तसेच एसटीने कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबई-गोवा महामार्गासह कोकणाकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढते. त्यामुळे टोलमाफीसोबतच वाहतूक व्यवस्थापनाचे आव्हानही प्रशासनासमोर असणार आहे. गणेशभक्तांना प्रवासादरम्यान अडचणी येऊ नयेत, तसेच टोलनाक्यांवर गर्दी होऊ नये, यासाठी संबंधित यंत्रणांना नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## भरती परीक्षा सुधारणांसाठी उच्चस्तरीय टास्क फोर्सचा राज्यव्यापी संवाद

- सहा विभागांना याच महिन्यात भेटी
- विद्यार्थी, उमेदवार व संबंधित घटकांशी साधणार थेट संवाद

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. राज्यातील भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सु-धारणा सुचविण्यासाठी टास्क फोर्स राज्यातील सर्व सहा विभागांना प्रत्यक्ष भेट देणार आहे.

या भेटीदरम्यान विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच अन्य संबंधित हितधारकांशी थेट संवाद साधून त्यांच्या सूचना, अडचणी व अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत.

टास्क फोर्सच्या विभागनिहाय भेटींचे वेळापत्रक

पुणे विभाग १२ सप्टेंबर २०२६
स्थळ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
ई-मेल : -pune-examreformstaskforce@maharashtra.gov.in

नागपूर विभाग १६ सप्टेंबर २०२६
स्थळ : डीपीडीसी हॉल, नियोजन भवन, सदर पोलीस स्टेशनच्या मागे, सिव्हिल लाइन्स, नागपूर
ई-मेल : -nagpur-examreformstaskforce@maharashtra.gov.in

अमरावती विभाग १७ सप्टेंबर २०२६
स्थळ : अमरावती
ई-मेल : -amravati-examreformstaskforce@maharashtra.gov.in

छत्रपती संभाजीनगर विभाग २१ सप्टेंबर २०२६
स्थळ : स्मार्ट सिटी कार्यालय, आमखास मैदानाजवळ, छत्रपती संभाजीनगर
ई-मेल : -csn-examreformstaskforce@maharashtra.gov.in

कोकण विभाग २९ सप्टेंबर २०२६
स्थळ : चेतना महाविद्यालय व मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई
ई-मेल : -konkan-examreformstaskforce@maharashtra.gov.in

नाशिक विभाग ३० सप्टेंबर २०२६
स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
ई-मेल : -nashik-examreformstaskforce@maharashtra.gov.in

नागरिक व संबंधित हितधारक आपल्या सूचना व अभिप्राय संबंधित विभागाच्या वरील ई-मेल पत्त्यावर पाठवू शकतात.

या विभागनिहाय संवादातून प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा टास्क फोर्सकडून अभ्यास करण्यात येणार आहे. त्याआधारे भरती परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध, परीक्षा सुरक्षेचे बळकटीकरण, प्रक्रियेतील पारदर्शकता व विश्वासार्हता वाढविणे तसेच परी-क्षा व्यवस्था अधिक उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक सुधारणांबाबत शासनास शिफारशी सादर करण्यात येतील.

भेटीची वेळ, सहभागाची प्रक्रिया तसेच इतर सविस्तर माहिती संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाकडून स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

## सप्टेंबर महिना लागला तरी अनेक छोट्या मोठे तलाव रिमाकेच

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंदखेडराजा** : सध्या पाऊस नसल्यामुळे एकीकडे खरीप हंगामातील सोयाबीन तूर कपाशी पिके धोक्यात आल्याचे चित्र आहे तर दुसरीकडे सिंदखेड राजा तालुक्यातील अनेक छोटे-मोठे तलाव अजूनही पूर्णपणे भरलेले नाहीत्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पाणी पुरेल की नाही याची सध्या तरी खात्री नाही.

सध्या खरीप हंगामातीलच पिके धोक्यात असल्यामुळे रब्बी हंगाम दीड दोन महिन्यावर येऊन ठेपला आहे अशातच सिंदखेडराजा तालुक्यामध्ये विशेषता : गहू हरभरा पालेभाज्या घेतल्या जातात तालुक्यातील साखरखेडा येथील महालक्ष्मी तलाव, अनेक गावांना पाणीपुरवठा करणारा गाय खेडी तलाव रताळी शिंदी येथील करंजाळी तलाव सावंगी भगत, गुंज या गावातील अजूनही तलाव पूर्णपणे भरलेले नाही, त्यामुळे खरीप व रब्बी हंगामा बरोबर उन्हाळ्यामध्ये अनेक ठिकाणी तीव्र स्वरूपाची पाणीटंचाई समस्या हिवाळ्यातच निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चिंतेचे वातावरण असून सप्टेंबर महिन्यात दमदार पाऊस पडावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे .




" माणूस जातो... पण त्याचे विचार, संस्कार आणि मार्गदर्शन अमर राहतात... "
|| बुद्धं शरणं गच्छामि ||
|| शिक्षित व्हा || || संघटित व्हा || || संघर्ष करा ||
विचार सेवा समता मानवता ...
आमचे मार्गदर्शक आधारस्तंभ
कालकथित
व्हि.ए.इंगळे साहेब (बाबा)
यांच्या स्मृतिदिनानिमित त्यांच्या पावन स्मृतीस
विनम्र अभिवादन
आपले मार्गदर्शन आमच्यासाठी सदैव प्रेरणादायी राहील...
अभिवादन कर्ते
सारनाथ बुद्ध विहार समिती व सम्राट मित्र मंडळ
हिवरा आश्रम ता. मेहकर जिल्हा बुलढाणा

## प्रत्येक पायरीवर साक्षरतेची गरज

साक्षरता ही केवळ अक्षर ओळख नसून व्यक्तीला शिक्षण, रोजगार, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सहभागाची दारे खुली करून देणारे सामर्थ्य आहे. 'लोक, पृथ्वी आणि समृद्धीसाठी साक्षरता' या संकल्पनेतून आता साक्षरतेचा अर्थ अधिक व्यापक करण्याची गरज अधोरेखित होते. 'युनेस्को'ने १९६६ मध्ये आपल्या १४ व्या महासंमेलनात आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाची घोषणा केली आणि ८ सप्टेंबर १९६७ रोजी तो प्रथम साजरा करण्यात आला. यंदा या उपक्रमाला ६० वर्षे पूर्ण होत आहेत. 'लोक, पृथ्वी आणि समृद्धीसाठी साक्षरता' ही २०२६ ची संकल्पना असून त्यामध्ये साक्षरतेचा संबंध केवळ शिक्षणाशी न जोडता सामाजिक समावेशकता, शाश्र्वत भविष्य, रोजगार आणि आर्थिक प्रगतीशी जोडला गेला आहे. हे बदललेले सूत्र महत्त्वाचे आहे. कारण, निरक्षरता व्यक्तीच्या आर्थिक आणि सामाजिक संधीही संकुचित करणारी ठरते. गेल्या सहा दशकांत जगाने साक्षरतेच्या बाबतीत लक्षणीय प्रगती केली असली, तरी तिचे समाधानकारक चित्र अजून तयार झालेले नाही. 'युनेस्को'च्या २०२४ च्या आकडेवारीनुसार, जगातील किमान ७३ कोटी ९० लाख युवक आणि प्रौढांकडे अजूनही मूलभूत साक्षरता कौशल्ये नाहीत. त्याच वेळी प्रत्येक १० मुलांपैकी ४ मुले वाचनातील अपेक्षित किमान प्रावीण्य गाठू शकत नाहीत. ही आकडेवारी अधिक अस्वस्थ करणारी आहे. कारण, शाळेत प्रवेश मिळणे आणि प्रत्यक्ष शिकता येणे यातील दरी त्यातून ठळकपणाने समोर येते. शाळांची संख्या, पटनोंदणी किंवा परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण ही शिक्षणाच्या प्रगतीची एक बाजू झाली; पण मुलांना वाचलेला मजकूर समजतो का, त्याचा अर्थ लावता येतो का आणि त्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करता येतो का, ही खरी कसोटी आहे. याच कारणामुळे साक्षरतेकडे आता मानवी अधिकार म्हणून पाहिले जाते. एखाद्या व्यक्तीला लिहिता-वाचता येत नसेल तर तिच्यापुढे शिक्षणाव्यतिरिक्त अन्य अनेक अडथळ्यांची मालिका उभी राहते. सरकारी योजना समजून घेण्यापासून बँकेतील व्यवहारांपर्यंत, रोजगार मिळविण्यापासून आरोग्यविषयक माहिती समजून घेण्यापर्यंत आणि स्वतःच्या कायदेशीर अधिकारांची जाणीव होण्यापासून सार्वजनिक व्यवहारांत सहभागी होण्यापर्यंत प्रत्येक पायरीवर साक्षरतेची गरज असते. व्यवहार डिजिटल होत चालल्यामुळे ही गरज आणखी तीव्र झाली आहे. वाचन-लेखन येत असूनही डिजिटल व्यवहार समजत नसतील, माहितीची सत्यासत्यता तपासता येत नसेल किंवा बदलत्या रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येत नसतील, तर साक्षरतेचे जुने प्रमाणपत्र अपुरे ठरते. यंदाच्या साक्षरता दिनाचे जागतिक आयोजन ८ आणि ९ सप्टेंबर रोजी मेक्सिकोतील चियापास येथे 'युनेस्को' आणि मेक्सिको सरकारच्या सहकार्याने होत आहे. शिक्षणमंत्री, तज्ज्ञ, शिक्षक आणि विद्यार्थी तेथे एकत्र येऊन गेल्या ६० वर्षांतील प्रगती, उरलेली आव्हाने आणि पुढील धोरणांची चर्चा करणार आहेत. जगभरातील उल्लेखनीय साक्षरता कार्यक्रमांना 'युनेस्को'चे आंतरराष्ट्रीय साक्षरता पुरस्कारही दिले जातील. अशा परिषदांचे महत्त्व आहेच; पण साक्षरतेची खरी लढाई परिषदांच्या सभागृहाबाहेर लढावी लागते. भारतासारख्या प्रचंड सामाजिक आणि आर्थिक वैविध्य असलेल्या देशासाठी या चर्चेचा अर्थ अधिक व्यापक आहे. शालेय शिक्षण प्रत्येक मुलापर्यंत पोहोचविणे ही पहिली पायरी होती. आता त्या शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते का, मुलांची वाचन-आकलन क्षमता विकसित होते का आणि आर्थिक-सामाजिक कारणांमुळे शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येते का, याकडे लक्ष द्यावे लागेल. प्रौढ साक्षरतेचाही प्रश्र्न दुर्लक्षित करता येणार नाही. बदलत्या तंत्रज्ञानाने निरक्षर व्यक्तीच्या अडचणी कमी केलेल्या नाहीत; उलट अनेक बाबतीत त्या वाढवल्या आहेत. या पार्श्र्वभूमीवर आकडेवारीतील साक्षरता आणि आयुष्य बदलणारी साक्षरता यांच्यातील अंतर कमी झाले पाहिजे. अक्षर ओळखणाऱ्या माणसाला माहिती समजली पाहिजे, माहितीचे ज्ञानात रूपांतर करता आले पाहिजे आणि त्या ज्ञानातून स्वतःच्या आयुष्याबद्दल अधिक स्वतंत्र निर्णय घेता आले पाहिजेत. स्मार्टफोन वापरणे म्हणजे डिजिटल साक्षरता, असा काहींचा समज असतो; पण त्यापुढे जात ऑनलाईन अर्ज भरणे, डिजिटल आर्थिक व्यवहार सुरक्षितपणे करणे, इंटरनेटवरील खरी आणि दिशाभूल करणारी माहिती ओळखणे, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साधनांचा विवेकाने वापर करणे हीदेखील आधुनिक साक्षरतेची अंगे झाली आहेत. ही सर्वांगीण किंवा व्यापक साक्षरता असणारे नागरिकच उद्याचा भारत सक्षमपणाने घडवू शकतील.

# अंभोरा गट ग्रामपंचायत हद्दीतील डम्पिंग यार्डमुळे नागरिक त्रस्त

## घाणीचे साम्राज्य, भटक्या कुत्र्यांचा वावर;
## प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात २१ सप्टेंबरपासून आमरण उपोषण





**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**देऊळगाव राजा :** अंभोरा गट ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या डम्पिंग यार्डमुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. डम्पिंग यार्ड परिसरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला आहे. दुर्गंधी, दूषित वातावरण आणि नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असतानाही संबंधित प्रशासनाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

असोला जहागीर येथील प्रभाकर डोईफोडे यांनी या प्रश्नाकडे नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी २१ सप्टेंबर २०२६ पासून नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

**जागा निवड आणि परवानग्यांवर प्रश्नचिन्ह**

डम्पिंग यार्डसाठी जागा निवडताना परिसरात वस्ती, विहीर, नाला आदी बाबींचा विचार करणे तसेच संबंधित पर्यावरणीय व घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे डोईफोडे यांनी म्हटले आहे.

तसेच आवश्यक परवानग्या, अहवाल आणि नियमांचे पालन झाले आहे का, याची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. सदर डम्पिंग यार्ड अंभोरा ग्रामपंचायत हद्दीत येत असल्याने ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची उपलब्धता तपासण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**सात गावांतील नागरिकांचा पाठिंबा**

या प्रश्नावर केवळ एका गावाचा नव्हे तर परिसरातील सात गावांतील नागरिकांचा सहभाग मिळवून आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. डम्पिंग यार्डमुळे होणाऱ्या त्रासातून नागरिकांची मुक्तता करावी, नियमांचे पालन न करणाऱ्यांची चौकशी करावी आणि कर्तव्यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. २१ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आमरण उपोषणाकडे आता नगरपरिषद प्रशासन आणि संबंधित विभाग काय भूमिका घेतात, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### तक्रारी करूनही उपाययोजना नाहीत?

डम्पिंग यार्डमुळे नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेऊन तातडीने उपाययोजना करणे अपेक्षित आहे. मात्र, वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. डम्पिंग यार्डच्या परिसरातील दूषित वातावरण, घाणीचे ढीग आणि भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे डोईफोडे यांनी म्हटले आहे.

# समर्थ कृषी महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव- ललित कला स्पर्धेचे आयोजन

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**




**देऊळगाव राजा :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत समर्थ कृषी महाविद्यालय देऊळगाव राजा येथे आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव- ललित कला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती नंदाताई कायंदे, उद्घाटक डॉ. मंजुषा देशमुख तर प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव सतीश कायंदे, श्रीहरी ठोसर, पियुष टाकळकर, अमर चिंतळे, प्राचार्य डॉ. नितीन मेहत्रे, उपप्राचार्य प्रा. देवानंद नागरे उपस्थित होते.

अध्यक्षा श्रीमती नंदाताई कायंदे यांनी अशा स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो असे सांगितले. कला ही व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असून, विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना सातत्याने विकसित करावे असे आवाहन केले. संस्थेच्या सचिवांनी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले.

सचिवांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक करत त्यांच्या कल्पकतेला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन दिले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी स्पर्धेकडे केवळ जिंकण्याच्या दृष्टिकोनातून न पाहता आपली कला आणि कौशल्य सादर करण्याची संधी म्हणून पहावे असे प्रतिपादन केले.

डॉ मंजुषा देशमुख यांनी यानिमित्ताने विविध महाविद्यालयांमधून आलेल्या युवा कलाकारांच्या प्रतिभेचा अविष्कार आपल्याला अनुभवता येणार आहे असे सांगितले. प्राचार्य डॉ नितीन मेहत्रे यांनी प्रत्येक कलाकारांच्या मनात वेगळे विश्व आहे आणि आजच्या ह्या व्यासपीठावर व्यक्त होण्याची संधी मिळणार आहे असे सांगून विद्यार्थ्यांना यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ संदीप हाडोळे यांनी या ललित कला स्पर्धा स्थळ चित्र, चिकटकला, पोस्टर मेकिंग, मातीकला, व्यंगचित्रे, रांगोळी, छायाचित्रण व इन्स्टॉलेशन या स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. सोनाली इंगळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा श्वेता धांडे, प्रा अनिता सानप, डॉ मनोज पटोकार, प्रा सचिन सोळंकी, प्रा विजय पवार, प्रा किशोर कव्हर तसेच सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### विद्यार्थी हित, गुणवत्तापूर्ण साहित्य आणि वाचन संस्कृती वृद्धीसाठी प्रकाशकांनी पुढाकार घ्यावा - मंत्री दादाजी भुसे

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**

**मुंबई :**विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, त्रुटीविरहित आणि परवडणारे शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही सर्व संबंधितांची सामूहिक जबाबदारी असून पालकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यासाठी प्रकाशकांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

राज्यातील विविध प्रकाशन संस्थांच्या प्रतिनिधींसमवेत मंत्री दादाजी भुसे यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शैक्षणिक साहित्यामधील व्याकरण, इतिहास किंवा विषयवस्तूसंदर्भातील त्रुटी टाळण्यासाठी विषयतज्ज्ञ, व्याकरण आणि इतिहासाचे जाणकार यांच्या मार्गदर्शनाचा अधिक प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. एखाद्या प्रकाशनातील त्रुटीमुळे शासनाबाबत गैरसमज निर्माण होऊ नयेत यासाठी प्रकाशकांनी अधिक दक्षता घ्यावी. प्रत्येक शैक्षणिक साहित्य शास्त्रीय आणि तथ्याधिष्ठित असावे असेही त्यांनी सांगितले. पालकांकडून विविध पुस्तकांच्या वाढत्या किमतींबाबत सातत्याने तक्रारी येत असल्याचे नमूद करून मंत्री भुसे यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक साहित्याची किंमत वाजवी ठेवण्यावर भर दिला. शाळा, संस्था आणि प्रकाशक यांनी समन्वयाने काम करून पालकांवरील आर्थिक भार कमी करण्याचे मार्ग शोधावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## दोन वर्षापासून प्रलंबित डि.पी; म.रा.वि वि कंपनी कार्यालयाची तोडफोड करण्याच्या

# ॲड. रावळ, गजानन ठोसर यांच्या इशाऱ्याने दुसऱ्या दिवशी बसविला ट्रॉन्सफार्मर

**निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी**





**मलकापुर:** तालुक्यातील जांबुळधाबा येथील लोणवाडी शिवारातील आ.संचेती बंधूंच्या गट नंबर १८५ मधील डी.पी तात्काळ बसवा अन्यथा सोमवारला म.रा.वि.वि कंपनी कार्यालयाची तोडफोड करण्याचा इशारा लोकनेते ॲड हरीश रावळ, शिवसेना (उबाठा)उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी कार्यकारी अभियंता आर.जी तायडे यांना गुरुवार दि.०४, सप्टेंबर २६ रोजी दिला होता.

तालुक्यातील जांबुळधाबा येथील लोणवडी शिवारातील आमदार चैनसुख संचेती व त्यांचे बंधू सुरेश संचेती यांची गट नंबर १८५ मध्ये शेती आहे. या शेतीमध्ये शेतकऱ्यांसाठी गेल्या दोन वर्षांपूर्वी आमदार संचेती यांच्या प्रयत्नातून डी.पी साठी स्ट्रक्चर उभारण्यात आले मात्र डि.पी ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले नाही,दोन वर्षापासून संबंधित शेतकऱ्यानी चकरा मारल्या मात्र या डीपीवर ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले नाही.

सद्यस्थितीत पावसाळा सुरू असून गेल्या दिड महिन्यापासून पावसाने दडी मारली आहे, शेतातील विहिरीमध्ये पाणी उपलब्ध असताना सुद्धा केवळ लाईट नसल्यामुळे पिकांना पाणी देता येत नाही, डोळ्यादेखत पिके सुकू लागली असल्याने या डीपीवरील ३५ ते ४० शेतकऱ्यांनी लोकनेते ॲड हरीश रावळ व शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांची भेट घेऊन आपबिती कथन केली होती.

संबंधित सर्व शेतकऱ्यांना घेऊन रावळ व ठोसर यांनी म.रा.वि.वि कंपनीचे कार्यकारी अभियंता आर.जी तायडे यांचे भारत कला रोडवरील कार्यालय गाठले, कार्यालयात अधिकारी उपस्थित नसल्याने तब्बल तीन तास ठिय्या आंदोलन केले.

या दरम्यान तायडे मोताळा येथे व्यस्त असल्याने भ्रमणध्वनीवरून त्यांच्याशी चर्चा करण्यात आली व दोन वर्षापासून उभ्या असलेल्या स्ट्रक्चरवर दोन दिवसांत डी.पी न बसविल्यास सोमवार रोजी म.रा.वि.वि कंपनी कार्यालय तोडफोड करण्याचा इशारा हरीश रावळ व गजानन ठोसर यांनी दिला कार्यालय तोडफोड आंदोलनाच्या धास्तीने दोन वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या ''त्या'' स्ट्रक्चरवर सोमवार दि.७ सप्टेंबर २६ रोजी ट्रान्सफॉर्मर बसविल्याने या डि.पी वरील शेतकरी विनायक जवरे, विजय मोरे, निना झांबरे, गोकुळ पाटील, राजू वाघोदे, अनिल झांबरे, गजानन पाटील, मनोज सुलताने, बाळू वाघोदे, रामभाऊ खर्चे,विकास झांबरे, अनंता पाटील, गजानन मोसे, पुरुषोत्तम वाघोदे, गजानन वाघोदे, क्रिष्णा चोपडे, पुरुषोत्तम तायडे, शरद बोरले, रामभाऊ वाघोदे, राजेंद्र वाघोदे, गजानन बऱ्हाटे, निवृत्ती खापोटे, भास्कर बावस्कर, मुरलीधर बावस्कर, दिलीप बावस्कर, पुंजाजी बावस्कर, चंद्रभागा काशीराम बावस्कर,मुरली किसन बावस्कर ,शंकर भारंबे, अनिता भास्कर बावस्कर, मधुकर सतीश बावस्कर,रामा मनोहर बावस्कर,सुधाकर विष्णू बावस्कर, नितीन चोपडे यांनी ॲड हरीश रावळ, शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर सह शिवसेना (उबाठा) पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ऍक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील.) RNI MHMAR/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

## व्यसनमुक्ती कार्याबद्दल राधेश्याम सुरेश बंगाळे यांचा होणार राज्यस्तरीय सन्मान !

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंदखेडराजा :** गेल्या अनेक वर्षापासून व्यसनमुक्तीचे कार्य अविरतपणे करणारे सिंदखेड राजा तालुक्यातील दरेगाव चे सुपुत्र राधेश्याम सुरेश बंगाळे यांना अतिशय प्रतिष्ठेचा समजल्या जाणारा दिवंगत वृक्षमित्र मधुकर खंडारे यांच्या यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित संत गाडगेबाबा समाजरत्न राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.



अनेक तरुणांना व्यसनापासून अलिप्त ठेवण्याचे काम बंगाळे करत आहेत याच कार्याची दखल घेत त्यांना सदर राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सदर पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे या अगोदर सुद्धा त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहे सदर निवड समितीचे अध्यक्ष विकास सुखदाने मुख्य आयोजक सचिन खंडारे समाधान सरकटे यांनी सदर निवड पत्र त्यांना दिले आहे.

याबद्दल राधेश्याम बंगाळे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की माझ्या व्यसनमुक्ती कार्याचे दखल घेत जो पुरस्कार मला जाहीर झाला आहे त्यामुळे अक्षरशा : आनंदाने मन भरून आले आहे ज्या ठिकाणी व्यसनमुक्तीचे काम करतो त्याच गावचा हा पुरस्कार आहे हा पुरस्कार माझ्यासाठी केवळ सन्मान नसून व्यसनमुक्तीच्या माध्यमातून समाजातील वंचित घोषित कष्टकरी आयुर्वेदिक नशा मुक्त केंद्राच्या माध्यमातून केलेली सेवा यांचं फलित आहे मी अनेक गावांमध्ये शिबिर घेतली आहे त्याचा सेफफळ म्हणावे लागेल अशा मुक्तीच्या कार्यातून अनेकांची सेवा करत असताना अनेक कुटुंबातील मुले नागरिक व्यसनाधीन असल्यामुळे अनेक कुटुंब दुःखी आणि चिंतेत असायचे आज त्यांचे दारू सुटल्यामुळे एक नवीन जीवन ते जगता याचा मला आनंद होत आहे अजूनही खूप मोठे काम करायचे आहे आयोजन समितीचे मनापासून धन्यवाद त्यांनी व्यक्त केले आहे.

## थ्रोम्बोसिसला ओळखा, जीव वाचवा! जागतिक थ्रोम्बोसिस दिनानिमित्त आरोग्य विभागाचे जनजागृती आवाहन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** थ्रोम्बोसिस अर्थात रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताची गाठ तयार होण्याच्या आजाराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. जागतिक थ्रोम्बोसिस दिनानिमित्त आरोग्य विभागाच्या वतीने थ्रोम्बोसिसची लक्षणे, जोखीम घटक आणि प्रतिबंधात्मक उपायांबाबत जनजागृती करण्यात येत आहे. रक्तवाहिन्यांमध्ये रक्ताची गाठ तयार झाल्यामुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होऊन गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे थ्रोम्बोसिसची लक्षणे वेळीच ओळखून तातडीने वैद्यकीय उपचार घेणे महत्त्वाचे आहे. एकाच पायाला अचानक सूज येणे, तीव्र वेदना होणे, त्वचेचा रंग लाल किंवा निळसर होणे तसेच सुजलेला भाग इतर भागापेक्षा उष्ण जाणवणे ही थ्रोम्बोसिसची संभाव्य लक्षणे आहेत. अचानक श्वास घेण्यास त्रास होणे किंवा छातीत तीव्र वेदना होणे ही गंभीर लक्षणे असून, अशावेळी तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी.

दीर्घकाळ एकाच जागी बसून काम करणारे किंवा लांबचा प्रवास करणारे व्यक्ती, मोठ्या शस्त्रक्रियेनंतर दीर्घकाळ अंथरुणावर असलेले रुग्ण, लठ्ठपणा, मधुमेह व उच्च रक्तदाब असलेले व्यक्ती तसेच धूम्रपान व तंबाखूचे सेवन करणाऱ्यांमध्ये थ्रोम्बोसिसचा धोका वाढू शकतो.

थ्रोम्बोसिसपासून बचावासाठी नियमित शारीरिक हालचाल व व्यायाम करावा. दररोज किमान ३० मिनिटे चालण्याची सवय लावावी. दीर्घकाळ प्रवास करताना किंवा कार्यालयीन कामादरम्यान वेळोवेळी उठून चालावे. पुरेसे पाणी प्यावे. धूम्रपान, तंबाखू व इतर व्यसनांपासून दूर राहावे. थ्रोम्बोसिसची कोणतीही संभाव्य लक्षणे आढळल्यास विलंब न करता जवळच्या शासकीय रुग्णालयात किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## 10 सप्टेंबरला बुलढाण्यात 'पेंशन अदालत'; निवृत्तीवेतनधारकांनी लाभ घेण्याचे आवाहन




निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** महालेखापाल नागपूर तसेच जिल्हा कोषागार कार्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील निवृत्तीवेतन धारक, कुटुंब निवृत्तीवेतन धारक आणि आहरण व संवितरण अधिकारी यांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी विशेष 'पेंशन अदालत' चे आयोजन करण्यात आले आहे. ही पेंशन अदालत गुरुवार, दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे पार पडणार आहे. या अदालतीमध्ये निवृत्तीवेतनधारकांच्या विविध अडीअडचणी व तक्रारींचे तात्काळ निवारण केले जाणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतन धारक व कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# देऊळगाव माळीत राऊत कुटुंबाकडून इको-फ्रेंडली गणेशमूर्तींची परंपरा; साच्याशिवाय काळ्या मातीत साकारतेय कला

निशस्त्र योध्दा/विशेष प्रतिनिधी

**देऊळगाव माळी :** हल्ली सण-उत्सव साजरे करताना आपण निसर्गाला आणि पर्यावरणाला कुठल्या धोकादायक टप्प्यावर आणून सोडले आहे, याचा सर्वांनीच अत्यंत गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. चहूकडे प्लास्टर ऑफ पॅरिसचा (पीओपी) बेसुमार शिरकाव, थर्मोकोलचा झगमगाट आणि रासायनिक रंगांचा अतिवापर यामुळे आपल्या नद्या, तलाव आणि विहिरींचा श्वास पार गुदमरून गेला आहे. अशा या प्रदूषणकारी आणि कृत्रिम गर्दीतही निसर्गाचा समतोल राखत मातीशी असलेले आपले पवित्र नाते जपण्याचे धाडस मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी येथील एका निष्ठावंत मूर्तिकार कुटुंबाने दाखवून दिले आहे.





देऊळगाव माळी येथील ज्येष्ठ मूर्तिकार हरिभाऊ राऊत आणि त्यांच्या परिवारातील तिसरी पिढी आजही कोणतीही रासायनिक भेसळ न करता, तसेच साच्याचा (डाय) जराही आधार न घेता केवळ स्वतःच्या हातांच्या कौशल्याने आणि शुद्ध काळ्या मातीने अत्यंत रेखीव आणि जिवंत गणेशमूर्ती साकारत आहे.

स्वर्गवासी राजाराम गणपत कुंभार यांच्यापासून सुरू झालेला हा पारंपरिक वारसा हरिभाऊ राऊत आणि त्यांचे सुपुत्र कैलास राऊत तितक्याच निष्ठेने व समर्पणाने पुढे चालवत आहेत. आज बाजारात शाडू किंवा नैसर्गिक मातीच्या मूर्तींऐवजी स्वस्त आणि आकर्षक दिसणाऱ्या पीओपीच्या मूर्तींचा पूर आला आहे.

मात्र, ही कृत्रिमता पूर्णपणे नाकारून विसर्जनानंतर निसर्गाच्या कुशीत सहज विलीन होणाऱ्या मूर्ती घडवणे, ही केवळ एक कला नसून ते एक मोठे सामाजिक उत्तरदायित्व आहे, ही या कुटुंबाची भावना आहे. राऊत कुटुंबाच्या याच अतुलनीय समर्पणाची आणि पर्यावरणपूरक कार्याची दखल खुद्द राज्य शासनानेही घेतली आहे.

तत्कालीन व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील मंत्रालयात हरिभाऊ राऊत यांना ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक व मानपत्र देऊन विशेष सन्मानित करण्यात आले होते. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा वा कुटुंबाचा नसून, त्यांनी जपलेल्या पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आणि परंपरेचा गौरव होता.

आजघडीला विघटन न होणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिससारख्या वस्तूंचा त्याग करणे आणि कृत्रिम जलकुंडात विसर्जन करण्याचा पायंडा पाडणे ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. निसर्गाचा हा समतोल अबाधित राखण्यासाठी देऊळगाव माळीचे हे राऊत कुटुंब घेत असलेले कष्ट हे केवळ एका सणापुरते सीमित नसून, येणाऱ्या भावी पिढ्यांसाठी एक दिशादर्शक वस्तुपाठ ठरत आहेत.

### निसर्गाची हानी रोखणे हेच खरे पूजण!

आज संपूर्ण जग हवामान बदल आणि वाढत्या प्रदूषणाच्या भयावह संकटाशी झुंजत आहे. अशा गंभीर परिस्थितीत आपण ज्या देवतेचा उत्सव साजरा करतो, त्या देवाची मूर्ती किंवा पूजासाहित्य निसर्गाला घातक ठरणार नाही याची दक्षता प्रत्येक नागरिकाने घ्यायला हवी. शाडू आणि काळ्या मातीच्या मूर्तींची स्थापना करणे हा केवळ एक पर्याय नसून निसर्गरक्षणाचा दृढ संकल्प आहे. मातीची मूर्ती घडवून निसर्गाचा समतोल राखणे हीच आमची खरी ईश्वरसेवा आहे.

**– हरिभाऊ राजाराम राऊत**
**(ज्येष्ठ मूर्तिकार, देऊळगाव माळी)**

## शिक्षक दिन ते साक्षरता दिन : शैलेश सावजी यांच्याकडून ३०० हून अधिक शिक्षकांचा अनोखा सन्मान




निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**डोणगाव :** शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून भावी पिढी आणि समाज घडविणारा खरा शिल्पकार आहे. याच भावनेतून शिक्षक दिन ते साक्षरता दिन या कालावधीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष, सुबोध युवक कल्याण मंडळाचे अध्यक्ष तथा विठ्ठल रुक्माई शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव शैलेश सपना सुबोधभाऊ सावजी यांच्या वतीने डोणगाव परिसरातील ३०० हून अधिक शिक्षकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

डोणगाव, शेलगाव, बेलगाव, गोहगाव, विठ्ठलवाडी, पांगरखेड आदी गावांतील विविध शाळांमध्ये कार्यरत शिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन, तर महिला शिक्षिकांचा साडी-चोळी देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे शिक्षकांच्या सन्मानासोबतच शाळांतील विद्यार्थ्यांनाही खाऊचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला.

यावेळी शैलेश सावजी यांनी ग्रामीण भागातील शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ''शिक्षणाचे बाजारीकरण होऊ न देता विद्यार्थ्यांना स्वतःची मुले समजून त्यांच्यावर संस्कार करणारे शिक्षक हे समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. शिक्षकांचा सन्मान म्हणजे केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या भवितव्याचा सन्मान आहे.

### गुरुंच्या कार्याला कृतज्ञतेचा सलाम; शेकडो विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरही खाऊमुळे उमटले हास्य

शेलगाव, बेलगाव, गोहगाव आणि डोणगाव येथे झालेल्या कार्यक्रमांना विविध मान्यवर, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतही समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा उपक्रम परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला आहे. शिक्षकांचा सन्मान, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि शिक्षणाच्या पवित्र कार्याला सलाम या त्रिसूत्रीने शैलेश सावजी यांनी शिक्षक दिनाला सामाजिक कृतज्ञतेचे भावनिक स्वरूप दिले.

## बुलडाण्यात 'वार्तालाप' माध्यम कार्यशाळेचे आयोजन

### 'कौशल्य विकास आणि भविष्यातील संधी' विषयावर प्रादेशिक माध्यमांच्या भूमिकेवर होणार चर्चा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या नागपूर येथील पत्र सूचना कार्यालयातर्फे बुलडाणा जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एकदिवसीय 'वार्तालाप' माध्यम कार्यशाळेचे आयोजन बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. बुलडाणा रेसिडेन्सी, गणेश नगर, मलकापूर रोड येथे सकाळी १० ते ३ या वेळेत ही कार्यशाळा होणार आहे. 'कौशल्य विकास आणि भविष्यातील संधी : जनजागृतीमध्ये प्रादेशिक माध्यमांची भूमिका' हा कार्यशाळेचा मुख्य विषय आहे. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राला बुलडाणा जिल्ह्यातील प्रमुख प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

कौशल्य विकास, पर्यटन, शाश्वत विकास तसेच केंद्र शासनाच्या विविध योजना व उपक्रमांमधील उदयोन्मुख संधींबाबत माध्यम प्रतिनिधींमध्ये जागरूकता निर्माण करणे हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश आहे. नागरिकांमध्ये जागरूकता, आकांक्षा आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासोबतच अचूक, वस्तुनिष्ठ आणि विश्वासार्ह माहितीचा प्रसार करण्यामध्ये प्रादेशिक माध्यमांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. यावर कार्यशाळेत विशेष भर देण्यात येणार आहे.

बुलडाणा जिल्ह्याच्या विकासाशी तसेच भविष्यातील क्षमतेशी संबंधित विविध क्षेत्रे व विषयांवर कार्यशाळेत तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये कौशल्य विकास, पर्यटन, शाश्वत विकास आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांमधील संधींबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच 'सरकारी धोरणे, कार्यक्रम, उपक्रम व उपलब्धी, पत्रकार कल्याण योजना तसेच पीआयबी फॅक्ट चेकबाबत मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांना माहिती पोहोचविण्यात पीआयबीची भूमिका' या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले आहे.

कार्यशाळेदरम्यान केंद्र शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी आणि माध्यम प्रतिनिधी यांच्यात संवाद सत्रही होणार आहे. या माध्यमातून पत्रकारांना केंद्र शासनाच्या योजनांचा तळागाळातील लाभार्थ्यांवर झालेला परिणाम प्रत्यक्ष जाणून घेता येणार आहे.

मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांमध्ये कार्यरत पत्रकारांसाठी आयोजित ही 'वार्तालाप' कार्यशाळा संवाद, ज्ञानाची देवाणघेवाण आणि क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी महत्त्वपूर्ण मंच ठरणार आहे. विषयतज्ज्ञ, शासकीय अधिकारी तसेच विविध योजनांच्या लाभार्थ्यांशी थेट संवाद साधण्याची संधी पत्रकारांना मिळणार असून, जनहिताच्या विषयांवर अधिक माहितीपूर्ण, अचूक आणि जबाबदार वार्तांकनाला यामुळे चालना मिळणार आहे.

## इंडिया स्किल्स स्पर्धेमध्ये कौशल्य दाखविण्याची युवकांना संधी

### ६३ कौशल्य प्रकारांचा समावेश; जिल्ह्यातील युवकांनी नोंदणी करण्याचे आवाहन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** विविध क्षेत्रांतील कौशल्य असलेल्या युवकांना आपले कौशल्य राष्ट्रीय स्तरावर सादर करण्याची संधी मिळणार असून, इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७ साठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर ही स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. बुलडाणा जिल्ह्यातील शहर तसेच ग्रामीण भागातील कौशल्यवान युवकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

या स्पर्धेत रंगकाम, मातीकाम, सुतारकाम, शेती, दागिने बनविणे, राजमिस्त्री काम, फॅशन टेक्नॉलॉजी, छायाचित्रण, चित्रकला, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर टेस्टिंग, इलेक्ट्रॉनिक्स, वेल्डिंग, बेकरी, सौंदर्यशास्त्र, आरोग्य व सामाजिक कार्य, हॉटेल व्यवसाय, सायबर सिक्युरिटी, डिजिटल कन्स्ट्रक्शन, माहिती तंत्रज्ञान, दंत चिकित्सा आदी एकूण ६३ कौशल्य प्रकारांचा समावेश आहे.

शिक्षणापेक्षा कौशल्याला प्राधान्य

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणत्याही विशिष्ट शैक्षणिक पात्रतेची अट नाही. त्यामुळे कमी शिक्षण असलेल्या किंवा ग्रामीण भागात राहणाऱ्या, मात्र एखाद्या क्षेत्रात उत्कृष्ट कौशल्य असलेल्या युवकांनाही आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धकांच्या जन्मतारखेबाबत संबंधित कौशल्य प्रकारानुसार पात्रता निश्चित करण्यात आली असून, ५६ कौशल्य प्रकारांसाठी १ जानेवारी २००६ नंतरचा, तर ७ कौशल्य प्रकारांसाठी १ जानेवारी २००३ नंतरचा जन्म असणे आवश्यक आहे.

असा करता येईल ऑनलाइन अर्ज : स्पर्धेसाठी इच्छुक उमेदवारांनी skillindiadigital.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा. अर्ज करताना प्रथम मोबाईल क्रमांक नोंदवून प्राप्त झालेला ओटीपी टाकावा. त्यानंतर आधार क्रमांक, शैक्षणिक माहिती आणि संबंधित कौशल्याची माहिती भरावी. आवश्यक माहिती भरून अर्ज सबमिट केल्यानंतर उमेदवाराची स्पर्धक म्हणून नोंदणी होईल.

अडचण आल्यास कौशल्य विकास केंद्रात मार्गदर्शन : ऑनलाइन अर्ज करताना अडचण येणाऱ्या युवकांनी बुलडाणा येथील बस स्थानक परिसरालगत असलेल्या जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व मार्गदर्शन केंद्राच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. येथे स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात येईल.

बुलडाणा जिल्ह्यात विविध क्षेत्रांत कौशल्य असलेल्या युवकांची संख्या मोठी आहे. ग्रामीण भागातील तसेच कमी शिक्षण असलेल्या युवकांनी कोणताही न्यूनगंड न बाळगता आपल्या कौशल्याचे महत्त्व ओळखावे आणि इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७ मध्ये सहभागी व्हावे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

# वीर जवानाला अखेरचा निरोप, सतीश मनोहर सोनवणे यांचा गंभीर दुखापतीमुळे झाला होता अपघात

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापूर :** देशसेवेचे कर्तव्य बजावत असताना गांधीनगर येथे झालेल्या रस्ता अपघातात मलकापुरातील जाधववाडी येथील सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) जवान सतीश मनोहर सोनवणे यांचा मृत्यू झाला. ५ सप्टेंबर रोजी झालेल्या या दुर्घटनेनंतर सोमवारी (दि. ७) त्यांचे पार्थिव मलकापुरात आणण्यात आले. देशभक्तीपर घोषणांमध्ये अंत्ययात्रा काढल्यानंतर लक्ष्मीनगर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी ४२ राऊंडची सलामी देत मानवंदना वीर जवानाला अखेरची आली. देण्यात सतीश सोनवणे हे गुजरात प्रंटियरअंतर्गत गांधीनगर येथील बीएसएफ मुख्यालयात कार्यरत होते. ५ सप्टेंबर रोजी कर्तव्यावर जात असताना मुख्यालयासमोरील मार्गावर एका कारने त्यांना धडक दिली. अपघातानंतर सहकारी जवान व अधिकाऱ्यांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, गंभीर दुखापतींमुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी सुरक्षा दलात १७ वर्षे सेवा दिली. ३ वर्षांनंतर ते सेवानिवृत्त होणार होते.

जवानाचे पार्थिव मलकापुरात दाखत होताच जाधववाडी परिसरात शोककळा पसरली. छत्रपती शिवाजीनगर येथून मुक्ताईनगर रोड, तहसील चौक, नांदुरा रोडमार्गे जाधववाडीपर्यंत अंत्ययात्रा काढण्यात आली. शेकडो नागरिक अंत्ययात्रेत सहभागी झाले.

भारत माता की जय च्या घोषणांनी परिसर दुमदुमला आणि नागरिकांनी वीर जवानाला अखेरचा निरोप दिला. मृत जवानाच्या पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुली व परिवार आहे.

**४२ राऊंडची सलामी!**

लक्ष्मीनगर येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी २१, तर जिल्हा पोलिस अधीक्षक मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी २१ अशा एकूण ४२ राऊंडची सलामी देऊन जवान सतीश सोनवणे यांना मानवंदना दिली. सलामीच्या वेळी उपस्थितांचे डोळे पाणावले होते.

**लोकप्रतिनिधी, अधिकारी, जवानांची उपस्थिती**



अंत्यसंस्कारासाठी आमदार चैनसुख संचेती, नगराध्यक्ष अतिक जवारीवाले, एसडीओ संतोष शिंदे, अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक अमोल गायकवाड, तहसीलदार समाधान सोनवणे, पोलिस निरीक्षक गणेश गिरी, नगरसेवक शिवराज जाधव यांच्यासह लोकप्रतिनिधी, अधिकारी, सीमा सुरक्षा दलाचे जवान आणि शेकडो नागरिक उपस्थित होते. सर्वांनी वीर जवानाला श्रध्दांजली अर्पण करून अखेरची मानवंदना दिली.

# नागरिकांना विहित कालमर्यादेत सेवा द्या; प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढा

## लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीचा राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांनी घेतला आढावा

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** नागरिकांना शासनाच्या सेवा पारदर्शक, कार्यक्षम आणि समयोचित पद्धतीने मिळणे हा त्यांचा कायदेशीर हक्क आहे. त्यामुळे नागरिकांना विहित कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देताना विलंब व दिरंगाई टाळावी. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपले उत्तरदायित्व ओळखून कार्यवाही करावी, असे निर्देश अमरावती विभागाचे राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात लोकसेवा हक्क अधिनियमाच्या बुलढाणा जिल्ह्यातील अंमलबजावणीचा आढावा राज्य सेवा हक्क आयुक्त अरुण डोंगरे यांनी घेतला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, कक्ष अधिकारी हक्क आयोग अमरावती देवेंद्र चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, यांच्यासह ऑनलाइन द्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच विविध विभागांचे यंत्रणाप्रमुख उपस्थित होते.

आयुक्त डोंगरे म्हणाले की, लोकसेवा हक्क अधिनियमानुसार नागरिकांना विविध शासकीय विभागांच्या अधिसूचित सेवा विहित कालमर्यादेत मिळणे आवश्यक आहे. हा कायदा राज्यातील सर्व शासकीय सेवा देणाऱ्या विभागांना लागू असून, सेवा वेळेत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे कोणतेही प्रकरण अनावश्यकपणे प्रलंबित ठेवू नये, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या.

प्रत्येक विभागांनी लोकसेवा हक्क अधिनियमाच्या डॅशबोर्डची तपासणी करून प्रलंबित प्रकरणांचा आढावा घ्यावा. नागरिकांच्या अर्जांवर वेळेत कार्यवाही होईल, याची दक्षता संबंधित विभागप्रमुखांनी घ्यावी. तसेच आपल्या विभागातील अधिकाधिक शासकीय सेवा अधिसूचित करून त्या नागरिकांना सहज आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात एकूण १ हजार ६९० 'आपले सरकार' सेवा केंद्रांपैकी ६०५ सेवा केंद्रांची तपासणी करण्यात आली आहे. तपासणीदरम्यान अनियमितता आढळून आलेल्या ८ सेवा केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच ३५२ नवीन 'आपले सरकार' सेवा केंद्रांसाठी जाहिरात काढण्यात आली असून, त्यापैकी ३२० ग्रामीण आणि ३२ शहरी भागांसाठी अर्ज घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी दिली.



## ऐन मोक्याच्या क्षणी पावसाची दांडी; शेतकरी चिंतातूर



निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**सिंदखेडराजा :** सध्या सिंदखेडराजा तालुक्यामध्ये समाधानकारक पाऊस पडला नसल्यामुळे खरीप हंगामातील पिके धोक्यात आल्याचे चित्र आहे सुरुवातीला दमदार पाऊस पडल्यामुळे छोटे-मोठे तलावामध्ये पाण्याचा साठा निर्माण झाला होता. मात्र त्यानंतर तुरळ ठिकाणी पाऊस पडला अनेक ठिकाणी कमी जास्त पाऊस झाला तर काही ठिकाणी जास्त पाऊस झाला काही ठिकाणी पाऊसच पडला नाही असे चित्र यावेळेस निर्माण झाले आहे सध्या सोयाबीन तुर कपाशी पिके पावसाअभावी सुकू लागली आहे. त्यामुळे सध्या तरी पावसाची पिकासाठी नितांत गरज असून ज्यांच्याकडे सिंचनाची सुविधा आहे असे शेतकरी शेतीला स्प्रिंकलर च्या साह्याने पाणी देत आहे मात्र ज्यांच्याकडे कोरडवाहू जमीन आहे सिंचनाची सुविधा नाही अल्पभूधारक शेतकरी आहेत असे शेतकरी मात्र ढगाकडे वाट पाहत आहे सोयाबीनचे पिके पावसाअभावी सुकू लागली आहे तर काही ठिकाणी सोयाबीनचे पिके दमदार असून सोयाबीनच्या शेंगा निर्माण व्हायला सुरुवात झाली आहे मात्र पावसा अभावी पिकाला सध्या धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे कृत्रिम पाऊस पडावा अशी मागणी सुद्धा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे सध्या पावसाची शेतकऱ्यांना नितांत गरज असून शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी सुद्धा अनेक ठिकाणी तालुक्यामध्ये टंचाई निर्माण झाली आहे सध्या मोक्याच्या क्षणी पाऊस पडला नाही तर मोठे संकट निर्माण होऊ शकते त्यामुळे सर्वच शेतकरी बांधव पावसाची वाट बघत आहे.

## प्रगती प्रकल्पामुळे पाच जिल्ह्यातील १,६०० खाटांची आरोग्य सुविधा बळकट होणार - मंत्री प्रकाश आबिटकर

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण, सुलभ आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी राज्य सरकारने महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'प्रगती' (प्राथमिक आरोग्यसेवेची नव्याने उभारणी, प्रगत प्रशासन आणि सुलभ तंत्रज्ञानाचा समन्वय) या राज्यस्तरीय सार्वजनिक आरोग्य सुधारणा प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पामुळे आरोग्य सेवांचा विस्तार, गुणवत्तावाढ आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांना गती मिळणार आहे. पाच जिल्ह्यांत जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन होणार असल्याने १,६०० खाटांची वाढ अपेक्षित असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

२०२६ ते २०३१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ४,२५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये आशियाई विकास बँकेकडून ७० टक्के म्हणजे सुमारे २,९७५ कोटी रुपये कर्ज, तर ३० टक्के म्हणजे १,२७५ कोटी रुपये राज्य शासनाचा हिस्सा राहणार आहे.

'प्रगती' प्रकल्पांतर्गत पाच जिल्ह्यांतील रुग्णालयांना मोठी बळकटी देण्यात येणार आहे. कोल्हापूर आणि नांदेड येथे प्रत्येकी ५०० खाटांची नवीन जिल्हा रुग्णालये, पुणे येथे २०० खाटांचे संदर्भसेवा रुग्णालय, तर लातूर आणि नागपूर येथील प्रत्येकी २०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे.

## महाराष्ट्र आरोग्य तंत्रज्ञान, संशोधन आणि वैद्यकीय नवोन्मेषाचे केंद्र म्हणून विकसित होणार : मंत्री रावल

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मुंबई :** विकसित महाराष्ट्र २०४७ च्या ध्येयपूर्तीसाठी आरोग्य क्षेत्र महत्त्वाचा आधारस्तंभ ठरणार असून वैद्यकीय तंत्रज्ञान, डिजिटल हेल्थ, जैवतंत्रज्ञान, संशोधन आणि प्रगत वैद्यकीय उपकरण निर्मितीचे जागतिक केंद्र म्हणून महाराष्ट्राला विकसित करण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राजशिष्टाचार, परकीय गुंतवणूक (एफडीआय) आणि प्रवासी महाराष्ट्रीय संपर्क मंत्री जयकुमार रावल यांनी केले.

कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज (सीआयआय) आयोजित 'सीआयआय हॉस्पिटल टेक २०२६' परिषदेत ते बोलत होते. यावेळी पद्मश्री डॉ. रमाकांत देशपांडे, जॉय चक्रवर्ती, सौरभ अग्रवाल, रिझवान कोईटा, नेदरलँड्स व युनायटेड किंगडम सरकारचे प्रतिनिधी, अल्पा अंतानी, ब्रिटिश उप उच्चायुक्त हरजिंदर कांग, नेदरलॅण्ड चे वाणिज्य दूत थिअरी वॅन हेल्डन तसेच आरोग्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, आरोग्य क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, टेलिमेडिसिन, प्रगत निदान तंत्रज्ञान आणि डिजिटल हेल्थमुळे मोठे परिवर्तन होत असले तरी तंत्रज्ञान रुग्णकेंद्रित आणि सर्वसामान्यांसाठी सुलभ राहणे आवश्यक आहे. मुंबई आणि महाराष्ट्रात जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, संशोधन संस्था, औषधनिर्मिती कंपन्या आणि आरोग्य क्षेत्रातील स्टार्टअप्सचे सक्षम जाळे निर्माण झाले असून या बळावर राज्याला आरोग्य नवोन्मेषाचे अग्रगण्य केंद्र बनविण्याचा शासनाचा मानस आहे.

## कॅपेसिटरमुळे कृषीपंपाची कार्यक्षमता वाढण्यास मदत

### रोहित्रावरील भार कमी होऊन नादुरुस्तीचे प्रमाण घटणार; ऑटोस्विचचा वापर बंद करण्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांचे आवाहन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**बुलढाणा :** पावसाने दीड महिन्यापासून दडी मारल्याने जिल्ह्यात कृषीपंपांचा वापर वाढला आहे. वीजपुरवठा सुरू होताच कृषीपंप स्वयंचलितपणे सुरू करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी ऑटोस्विच बसविले आहेत. मात्र, एकाच रोहित्रावरील अनेक कृषीपंप एकाच वेळी सुरू झाल्याने अचानक मोठ्या प्रमाणात विद्युतभार निर्माण होतो. परिणामी रोहित्र जळणे, नादुरुस्ती, वीजवाहिन्यांवरील तारा तुटणे तसेच वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आपल्या कृषीपंपाच्या क्षमतेनुसार योग्य क्षमतेचा कॅपेसिटर बसवावा आणि ऑटोस्विचचा वापर तात्काळ बंद करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

कॅपेसिटरच्या वापरामुळे कृषीपंपाला आवश्यक रिॲक्टिव्ह पॉवर स्थानिक पातळीवर उपलब्ध होते. त्यामुळे वीजवाहिन्यांमधून वाहणारा अतिरिक्त विद्युतप्रवाह कमी होऊन रोहित्रावरील भारही कमी होतो. कृषीपंपांमध्ये प्रामुख्याने इंडक्शन मोटारींचा वापर होतो. मोटार सुरू असताना वाहणाऱ्या अतिरिक्त इंडक्टिव्ह करंटमुळे वीजवाहिन्या व रोहित्रांवर ताण वाढतो. परिणामी मोटार जळणे, रोहित्र ओव्हरलोड होणे, फॉल्ट होणे आणि एलटी लाईन ट्रिप होण्याचे प्रकार घडू शकतात. योग्य कॅपेसिटर बसविल्याने हा अतिरिक्त भार कमी होण्यास मदत होते आणि कृषीपंपाची कार्यक्षमताही सुधारते.

बाजारात ३ एचपी कृषीपंपासाठी १ केव्हीएआर, ५ एचपीसाठी २ केव्हीएआर आणि ७.५ एचपीसाठी ३ केव्हीएआर क्षमतेचे कॅपेसिटर उपलब्ध आहेत. कॅपेसिटर बसविताना तो इनकमिंग बाजूला न जोडता स्टार्टर आणि मोटारीला जोडलेल्या वायरला, म्हणजेच मोटारीपूर्वी जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे मोटार सुरू असतानाच कॅपेसिटर कार्यरत राहतो.

कॅपेसिटर बसविण्यापूर्वी आणि बसविल्यानंतर केलेल्या मोजमापात विद्युतप्रवाह ४.८ अँपिअरवरून ३.३ अँपिअरपर्यंत कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषीपंपाच्या क्षमतेनुसार योग्य कॅपेसिटर बसवून तसेच ऑटोस्विचचा वापर टाळून महावितरणच्या वीज यंत्रणेवरील ताण कमी करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

# अवैध बायोडिझेल साठ्यासह तब्बल २१ लाख ६९ हजारांचा मुद्देमाल जप्त

## सिंदेखेडराजा तालुक्यासह मेहकर, बुलढाणा येथे धाड

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**सिंदखेडराजा :** मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकाने अवैध बायोडिझेल वापराचा पर्दाफाश केला आहे.वृंदावन लॉन्स जवळ, हॉटेल बंजाराच्या समोर, छत्रपती शिवाजी महाराज बायपास रोडवरील मोकळ्या जागेत, मेहकर, जि. बुलढाणा) व दुसरबीड गाव, हॉटेल गावकरी फॅमिली रेस्टॉरंटच्या समोर, सिंदखेडराजा, बुलढाणा येथे सुरू असलेल्या अवैध बायोडिझेल पंपावर धडक छापा टाकण्यात आला. या धडक दोन्ही कारवाईत २१ लाख ६९ हजार रुपये किमतीचे एक मालमोटार ट्रकसह बायोडिझेल सदृश्य पेट्रोलियम द्रव पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे.

नियंत्रक शिधावाटप व राज्यस्तरीय दक्षता पथकाचे प्रमुख चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाने घटनास्थळावरून Ashok Leyland कंपनीचा ट्रक, भूमिगत लोखंडी टाक्या, डिस्पेन्सर युनिट, डिझेल साठा, पाईप व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरचा बायोडिझेल सदृश्य पेट्रोलियम द्रव पदार्थाचा हा अवैधसाठा नेमका कोठून आणण्यात आला होता? याचा छडा लावण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि आरोपींवर जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत (Essential Commodities Act) गुन्हा दाखल करण्यात आला असून, स्थानिक पोलीस आणि पुरवठा विभागाचे पथक पुढील तपास अत्यंत गतीने करत आहे. या कारवाईत राज्य दक्षता पथकातील उपनियंत्रक शिधावाटप अंमलबजावणी गणेश बेल्लाळे, सहायक नियंत्रक शिधावाटप श्री प्रदीप काळे, मुख्य निरीक्षण अधिकारी श्री नागनाथ हंगरगे तसेच, शिधावाटप निरीक्षक सर्वश्री. राजेश सोरते, अरुण काते, विकास नागदिवे, पवन कुंभले, रविंद्र राठोड, राजीव भेले, देवानंद थोरवे, रामराजे भोसले, दिपेंद्र परूळेकर, अमोल बुरटे, चंद्रकांत कांबळे, राहूल इंगळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी नहुशकुमार बोरोडे, शुभम फाले, पुरवठा निरीक्षक, विवेक जगताप, सुनील झाल्टे, गोदाम लिपिक विशाल लोखंडे सहभागी होते. अशा प्रकारच्या अवैध इंधन आणि गॅस तस्करांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा चंद्रकांत डांगे (भा.प्र.से.) यांचेकडून देण्यात आला आहे.

# पिक पाहणी सहाय्यकांचे विविध मागण्या व काम बंद आंदोलन बाबत महसूल मंत्री यांना निवेदन

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी



**मेहकर :** मेहकर तालुक्यातील पिक पाहणी सहाय्यकांच्या वतीने विविध मागण्या बाबत ७ सप्टेंबर रोजी तहसीलदार मेहकर यांच्या मार्फत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारच्या डिसीएस एम एच अँप वर ई-पीक पाहणी करण्यासाठी पिक पाहणी सहाय्यक यांची नियुक्ती करण्यात आली असून सदर पिक पाहणी सहाय्यकास प्रती प्लॉट १० ते १२ रुपये मानधन दिले जाते.

मात्र ई- पीक पाहणी करताना प्रत्यक्ष शेतामध्ये जाऊन काम करावे लागते. या कामादरम्यान अपघात, सर्पदंश, वन्य प्राण्यांचा धोका तसेच इतर अनपेक्षित घटनांचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे ई-पीक पाहणी सहाय्यकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व कार्यक्षमतेच्या वाढीसाठी १)अपघात विमा कवच- ई-पीक पाहणी सहाय्यकांना ₹१ कोटींचे अपघात विमा कवच देण्यात यावे. २) प्रति प्लॉट मोबदला- ई-पीक पाहणी करिता प्रति प्लॉट ₹ १०० देण्यात यावे. ३) सुरक्षा किट व सुविधा- कामाच्या कालावधीत आवश्यक सुरक्षा सुविधा व संरक्षणात्मक उपाय उपलब्ध करून द्यावेत (सुरक्षा किट देण्यात यावे). ४) मोबाईल डेटा- इंटरनेट व ऑनलाईन कामाकरिता आवश्यक मोबाईल डेटा उपलब्ध करून देण्यात यावा.

सर्व मागण्यांचा सहानभूतीपूर्वक विचार करून त्वरित आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करावी.मागण्या मंजूर न केल्यास दि ८ सप्टेंबर पासून काम बंद आंदोलन करणार येईल असे निवेदन मेहकर तालुक्यातील पिक पाहणी सहाय्यकांच्या वतीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार सिद्धार्थ खरात,माजी आमदार डॉ संजय रायमुलकर, तहसीलदार मेहकर यांना यांना दिले.

यावेळी मदन खरात, भगवान बघे,विष्णु आखरे, प्रवीण ठोकळ,विजय शिरसाठ, स्वप्निल शिंदे, रामदास आल्हाट,प्रेम गाडे, अनिल पवार, अमोल निकम, गोपाल ठोकळ, ताराचंद चव्हाण, सुनील राठोड,अंनता गोरडे, प्रवीण काळे, संदिप चांदणे, अनिकेत निकम, शिवप्रसाद सवडदकर, सुरेश राठोड, शैलेश आडे, संदेश धांडे,अंनता रहाटे,विशाल काळे, ईश्वर बोरकर, प्रविण सरदार सह पिक पाहणी सहाय्यक बांधव उपस्थित होते.

# डीपीची तार चोरताना पकडलेला आणि रुग्णालयातून पसार झालेला आरोपी अखेर जेरबंद

## मलकापूर न्यायालयाने तिघांना सुनावली एक दिवसाची पोलीस कोठडी!

निशस्त्र योध्दा/प्रतिनिधी

**मलकापुर:** रणथम येथे महावितरणच्या डीपीची तार चोरताना पोलिसांच्या हाती लागलेला आणि वैद्यकीय तपासणीदरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयातून पोलिसांना गुंगारा देऊन पसार झालेला सराईत गुन्हेगार प्रतापसिंग बावरी याला स्थानिक गुन्हे शाखेने भुसावळच्या दीपनगरमधून पुन्हा बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात त्याला पळून जाण्यास मदत करणारा त्याचा भाऊ तुफानसिंग बावरी यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



या तिन्ही आरोपींना आज ८ सप्टेंबर रोजी दसरखेड एमआयडीसी पोलिसांनी मलकापूर न्यायालयात हजर केले. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेत आरोपींना १ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

काय आहे नेमके प्रकरण?

रणथम बसस्थानकाजवळ डीपीची ॲल्युमिनियम तार कटरने कापत असताना प्रतापसिंग बावरी व कपूरसिंग बावरी यांना रंगेहात पकडण्यात आले होते. त्यांच्याकडून 'छोटा हत्ती' वाहन, कटर व तार असा ५ लाख ६ हजारांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

वैद्यकीय तपासणीसाठी बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले असता, प्रतापसिंग हा स्वच्छतागृहाच्या खिडकीतून पसार झाला होता. स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे माग काढत त्याला आणि त्याचा भाऊ तुफानसिंग या दोघांना भुसावळ येथून पल्सर मोटारसायकल व दोन मोबाईलसह ताब्यात घेतले.

आरोपींना एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाल्याने डीपी तार चोरीचे मोठे रॅकेट आणि इतर गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. पुढील तपास दसरखेड एमआयडीसी पोलीस करत आहेत.